## निशाण क्र. ४७ वरील आदेश

प्रतिवादी क्र. २ याने प्रस्तुतचा अर्ज कैफियतीमध्ये दुरूस्तीस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत दाव्याचे कामी नि. क्र. २० वर प्रतिवादीने कैफियत व नि. क्र. ५ वर म्हणणे सादर केले आहे. सदर कैफियतीमध्ये परिच्छेद क्र. ११ मध्ये दुस—या ओळीत आहेत या शब्दानंतर स्वल्पविराम चिन्ह देण्याऐवजी पूर्णविराम देण्यात आला आहे. तसेच त्याच परिच्छेदात वरून चौथ्या ओळीमध्ये पक्षकार केल्याखेराज या शब्दांपुढे ' सदर दावा चालणेजोगा नाही' मध्ये सदर ऐवजी सबब असे हस्तदोषाने नमूद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदर कैफियतीमधील परिच्छेद क्र. १३ मध्ये पहिल्या ओळीत 'वादीने दाव्यात' हे शब्द दोनवेळा टंकलेखित झाले आहेत. सदरच्या सर्व चुका या हस्तदोष व टंकलेखनातील असून सदर दाव्याचे गुणदोषावर अंतिमत: योग्य निराकारण होणेकरीता प्रतिवादीचे कैफियतीतील सदरच्या चुका दुरूस्त करणे गरजेचे बनले आहे. सदरची दुरूस्ती केल्यामुळे दाव्याचे अथवा कैफियतीचे मुळ स्वरूपात कोणताही बदल संभवत नाही. सदरच्या चुका या अलीकडेच वादीचा उलटतपास घेण्याच्या अनुषंगाने तयारी करतेवेळी निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे त्या यापूर्वी दुरूस्त करणे संदर्भात कोणतीही कारवाई करणेत आली नाही. सदर चुकांची दुरूस्ती झाल्यामुळे वादीचे हितसंबंधावर कोणताही परिणाम घडून येणार नाही. सबब सदरची दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रतिवादी क्र. २ ने केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे सादर केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्ज विलंबाने दाखल करणेचे कारण दिलेले नाही. दाव्याची सुनावणी पूर्ण झालेली असलेने दुरूस्ती करता येणारी नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

३. वादी, प्रतिवादी क्र. २ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तूतचा दावा हा वाटप व पृथक कब्जा करीता आहे असे दिसून येते. अर्जात नमूद केलेली दुरूस्ती दाव्यामध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. सदरची दुरूस्ती ही टंकलेखन स्वरूपाची आहे. त्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात मूळीच बदल होणार नाही. तसेच सदर दुरूस्तीस परवानगी दिल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आजपासून १४ दिवसांचे आत नियोजित दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: १४/०८/२०१९

( बी. आर. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Balkrishna Rajaram Patil

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.08.14 16:19:44 +0530